# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. माअधि/अपिल/०९/२०१८
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका.
दि.०८/०२/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

....... **अपिलार्थी**

श्री.प्रदिप दिलीप जंगम,
जी-१०, गणेश भवन, नर्मदा नगर,
केबीन रोड, भाईंदर (पुर्व)

**विरुध्द**

....... **प्रतिवादी**

जनमाहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक, कर विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**-: विवेचन :-**

श्री.प्रदिप दिलीप जंगम, भाईदर (पुर्व) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जन माहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक, कर विभाग यांचेकडे दि.०२/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) श्री.अरविंद आनंद शेट्टी, ३ डी, सी.स्केप, विली नंबर ३, युनिट डी, उत्तन चौक भाईंदर पश्चिम या सदनिकेसाठी आकारण्यात आलेली करपावती देण्यात यावी.

२) सदर मिळकतीवर सदनिका असुन तसा दाखला जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.१/२१४५/२०१७-१८ दिनांक २५/७/२०१७ रोजी देण्यात आला आहे त्याची प्रत जोडत आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणेः-**
मागितलेली माहिती अप्राप्त असल्याने अपीलार्थी यांनी दि.१५/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. परंतु सदर अपिल हे दि.२५/०१/२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

**सुनावणीचा तपशिलः-**
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक, कर विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०९/०२/२०१८ रोजी दुपारी १२.२० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ/आस्था/२०८/२०१७-१८ दि.०३/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक, कर विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवादः- माझ्या दि.०२/१२/२०१७ रोजीच्या अर्जाप्रमाणे कर विभागाकडून माहिती देण्यात आली नाही.

२) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवादः- अपिलार्थी अर्जदार यांना १० दिवसांत अभिलेखाचा शोध घेऊन माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जन माहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्देनिहाय माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत अपील दाखल करण्यात येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतिः-

१) श्री.प्रदिप दिलीप जंगम,
जी-१०, गणेश भवन, नर्मदा नगर,
केबीन रोड, भाईंदर (पुर्व)

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक, कर विभाग

३) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय